**ठळक बातम्या**

- अमेरिका, इस्राइल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या मृतांची संख्या १ हजाराच्या वर

- हरवलेल्या महिलांचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष पथक

- राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाकडून विनोद तावडे, रामदास आठवले यांना संधी, महाविकास आघाडी शरद पवारांच्या पाठीशी

- ज्येष्ठ पत्रकार आणि माजी खासदार एच के दुआ यांचं निधन

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेतल्या उपांत्य फेरीतल्या न्यूझीलंड विरुद्धच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेची खराब सुरुवात

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान सुरू असलेल्या युद्धात इराणमधल्या मृतांची संख्या १ हजार ४५ इतकी झाल्याचं इराणच्या सरकारने सांगितलं आहे. आतापर्यंत ज्या मृतदेहांची ओळख पटली आहे. त्यांच्या दफनाची तयारी करण्यात आल्याचं सरकारने म्हटलं आहे.

श्रीलंकेच्या दक्षिण किनाऱ्याजवळ इराणी नौदलाच्या जहाजावर झालेल्या पाणबुडी हल्ल्यानंतर किमान १०१ जण बेपत्ता झाले आहेत आणि ७८ जण जखमी झाले आहेत. श्रीलंकेच्या नौदलाने अनेक इराणी नौदल कर्मचाऱ्यांना वाचवलं असून त्यापैकी ३२ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असून जहाजावरच्या अन्य कर्मचाऱ्यांचा शोध सुरू आहे.

दरम्यान, इस्रायलच्या विरोधात असलेल्या इराणच्या प्रत्येक नेत्याला संपवण्याचं लक्ष्य ठेवल्याची धमकी इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी दिली आहे. अमेरिकेचे हल्ले सुरू राहिले तर आखाती देशांमधल्या सर्व लष्करी आणि आर्थिक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्याचा इशारा इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डनं दिला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधली युद्धजन्य परिस्थिती पाहता एअर इंडियानं टोरोंटो,फ्रँकफर्ट आणि पॅरिससाठी जादा विमान उड्डाणं द्यायची ठरवलं आहे. उद्यापासून येत्या ११ तारखेपर्यंत दिल्ली आणि टोरोंटो या दरम्यान ३ अतिरिक्त विमानं सोडण्यात येतील. दिल्ली फ्रँकफर्ट सेवेसाठी ३ उड्डाणं तर पॅरिसकरीता एक उड्डाण होईल.

<><><><><>

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातल्या युद्धामुळे आखाती देशांतून होणारा गॅसपुरवठा विस्कळीत झाला असून गुजरातमध्ये मोरबी इथला सिरॅमिक उद्योग पुढच्या काही दिवसात बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या युद्धाचे पडसाद मध्य-पूर्वेतल्या देशांवर पडल्यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाली आहे. त्यामुळे सिरॅमिक उद्योगासाठी लागणारा प्रोपेन गॅसचा पुरवठा खंडित झाला आहे. मोरबी भागात जवळपास ६०० लहानमोठे सिरॅमिक निर्मिती कारखाने आहेत. त्यापैकी बहुतांश सिरॅमिक निर्मिती कारखान्यांमध्ये पुढचे तीन ते चार दिवस पुरेल इतकाच गॅस शिल्लक आहे.

<><><><><>

आखाती देशात अडकलेल्या नागरिकांच्या बाबतीत राज्य शासन सतर्क असून त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. अडकलेल्या नागरिकांचे

संदेश आल्यावर तत्काळ केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधण्यात आला. नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असं ते म्हणाले. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी सोपवली आहे. नागरिकांसाठी विशेष व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला असून त्यावरून येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.
युद्धामुळे अडकलेल्या शेतमाल निर्यातीचा प्रश्न गांभीर्याने घेतला जाईल, असं फडणवीस म्हणाले.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

आंतरराष्ट्रीय तणावामुळे जेएनपीए बंदरात राज्यातील शेतकऱ्यांच्या फळे आणि भाज्यांनी भरलेले कंटेनर अडकल्यामुळे निर्यातीवर परिणाम होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीची शक्यता निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात केंद्राशी संपर्क साधण्यात आला असून केंद्राने दिलेल्या सूचनांची माहिती सभागृहाला देण्यात येईल, असं उत्तर राज्याचे मत्स्योत्पादन आणि बंदरं मंत्री नितेश राणे यांनी दिलं.

**<><><><><>**

हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या विशेष पथकामुळे गेल्या वर्षभरात हरवलेल्या महिलाचा शोध लागण्याच्या प्रकरणांची संख्या १० टक्क्यांनी वाढल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**मुख्यमंत्री BYTE -3.18 -3.50)**

२० जानेवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान ऑपरेशन मुस्कान राबवण्यात आलं होतं. त्यातून १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ४५४ मुले आणि ९४७ मुली अशी एकूण १४०१ बालके शोधण्यात आली असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

<><><><><>

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी राज्यातल्या जागांकरता भारतीय जनता पार्टीने ४ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, ज्येष्ठ नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

राज्यसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबईत संयुक्त पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. पवार यांच्या उमेदवारीला काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अनुकूलता दर्शवल्यानंतर राज्याचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी पाठिंब्याची घोषणा केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानंही शरद पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

<><><><><>

ज्येष्ठ पत्रकार आणि माजी खासदार हरिकृष्ण उर्फ एच के दुआ यांचं आज नवी दिल्लीत वार्धक्याने निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. पत्रकारितेत ४ दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत दुआ यांनी हिंदुस्तान टाईम्स, इंडियन एक्सप्रेस , ट्रिब्यून या अग्रगण्य वर्तमानपत्रांमधे संपादक आणि प्रमुख संपादक म्हणून काम केलं. टाईम्स ऑफ इंडियाचे संपादन सल्लागार म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. २००९ ते २०१५ या काळात ते राज्यसभेचे नामनिर्देशित सदस्य होते.

डेन्मार्कमधे भारताचे राजदूत म्हणून त्यांनी काम केलं होतं. तसंच दिवंगत अटलबिहारी वाजपेयी आणि एच के देवेगौडा या प्रधानमंत्र्यांचे ते माध्यम सल्लागार होते.

<><><><><>

ऑस्ट्रेलियातल्या पर्थ इथं सुरु असलेल्या ए एफ सी फुटबॉल स्पर्धेत आज झालेल्या पहिल्या सामन्यात भारताचा महिला फुटबॉल संघ पराभूत झाला आहे. व्हिएतनामच्या संघानं भारतीय संघावर १-२ नं मात करत हा सामना जिंकला आहे.

या स्पर्धेसाठी भारतीय महिला फुटबॉल संघ तब्बल २३ वर्षांनंतर पात्र ठरला असून या फुटबॉल स्पर्धेत विजयी होणारे संघच पुढच्या वर्षी होणाऱ्या फिफा वूमेन्स वर्ल्ड कप साठी पात्र ठरणार आहेत.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला पहिला उपान्त्य सामना आज कोलकात्यात ईडन गार्डन्स मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड दरम्यान सुरू आहे. सात वाजता सुरू झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सलामीच्या फलंदाजांना सूर गवसलेला नाही. आतापर्यंत दक्षिण आफ्रिकेच्या एकाही खेळाडूला खेळपट्टीवर टिकता आलेलं नाही. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १४ षटकात ५ बाद १०१ धावा झाल्या होत्या.

उपान्त्य फेरीत भारताची गाठ उद्या इंग्लंडशी पडेल. हा सामना मुंबईत वानखेडे मैदानावर होईल.

<><><><><>

बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी मात्र पराभूत झाली. मलेशियाच्या कांग खाई झिंग आणि आरोन तै या जोडीनं आज त्यांच्यावर  २१-२३, १२-२१ अशी मात केली आहे. पुरुष एकेरी गटातला भारताच्या आयुष शेट्टीचा आजचा सामना इंडोनेशियाच्या ए. फरहानशी  होणार आहे. मिश्र दुहेरी गटात भारताच्या रोहन कपूर आणि ऋत्विका गड्डे या जोडीचा सामना फ्रेंचच्या थॉम जिक्वेल आणि डेल्फाईन डेलर्यु या जोडीशी होणार आहे.

//<><><><><>//